स्फुट/५(९४)

# इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

## —: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक स्फुट/५ (९४)

ग्रंथ नाम सोमवती पूजा.

छापील.

विषय म० धा० ग्रंथ.

Rajawade Sanshodhan Mandal ... Joint project of the ... Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

# अथसोमवतीपूजाकथासार्थप्रारंभः


सगुणाबाई
यमुताई
रामभट
गोविंदभट
अश्वत्थना
यण.
पूजा करि.
सोमापरीण.
सत्यभामाबाई

श्रीगणेशायनमः॥ सोमवतीपूजालिख्यते॥ समुखश्चेत्यादि॥पुण्यतिथौ मम आत्मनः॥
पुरुषकर्तृके श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं स्त्रीकर्तृके पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं॥ ममेह
अस्यां सोमवत्यमायां सकलपापक्षयार्थं पुत्रपौत्राद्यभिवृद्ध्यर्थं जन्मजन्मन्यवैधव्यसंततौ चिर
जीवितपरमसौभाग्यप्राप्तिकामः अश्वत्थमूले लक्ष्म्यासहित ब्रह्मशिवसहित अश्वत्थनाराय
ण प्रीत्यर्थं विष्णुपूजांच करिष्ये॥ तदंग निर्विघ्नतासिद्ध्यर्थं गणपतिस्मरणं कलशपूजनंचक
रिष्ये॥ वक्रतुंड इति गणपतिस्मरणं॥ कलशस्य मुखे विष्णु इति कलशपूजनं॥ अपवि
त्रः पवि०॥ कलशोदकेन पूजाद्रव्याणि प्रोक्ष्य आत्मानंच प्रोक्षयेत्॥ अथ ध्यानं॥ शांता
कारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं। विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगं॥ लक्ष्मीकांतंक
मलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम्। वंदे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम्॥१॥ व्यक्ताव्य-
क्तस्वरूपाय सृष्टिस्थित्यंतकारिणे॥ आदिमध्यांतहीनाय विष्टरश्रवसे नमः॥२॥ शंख-
चक्रगदापद्मधरं पीतांबरावृतं॥ वनमालाकौस्तुभादि युतं लक्ष्मीपतिं भजेत्॥३॥ अश्व
त्थनारायणाय नमः ध्यानं समर्पयामि॥ ब्रह्मविष्णुशिवादीनां स्थानं त्वं वृक्षराट् स्वयं॥ अं
गैः सर्वैः सह स्वामिन् स्थातव्यं तुलया विभो॥ सहस्रशीर्षेत्यावाहनं॥ अश्वत्थना० आवाहनं
सम०॥ मूलानि ब्रह्मणो यस्य ऋग्वेदांगादयस्तथा॥ फलानि यज्ञशाखाश्च वाङ्मयो मेद-
यां कुरु॥ पुरुष एवेदमासनं॥ अश्वत्थना० आसनं स०॥ सर्वतीर्थमयो यस्मात्ते सर्वदेवम
यो यतः॥ स सर्वतीर्थांबुमयं पाद्यमादत्स्व वृक्षराट्॥ एतावानस्येति पाद्यं॥ अश्वत्थना० पाद्यं
स०॥ आपो धनस्य यद्बीजं आपो धर्मः सनातनः॥ अद्भ्यः पवित्रं नास्त्यन्यदपामर्घ्यं गृहा-

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

णमे ॥त्रिपादूर्ध्वमर्घ्यं ॥अश्वत्थना॰ अर्घ्यंस॰॥शङ्खंतिद्रव्यमात्राणिगंगातोयेननित्यशः
॥अनःसर्वाणिजातानिवृक्षराजनमोस्तुते॥ तस्माद्विराळाचमनीयं॥अश्वत्थना॰आचम-
नीयंस॰॥गंगादियमुनेचैवगोदावरिसरस्वती॥तापीपयोष्णीरेवाचस्नानार्थंप्रतिगृह्यतां॥
यत्पुरुषेणस्नानं॥अश्वत्थना॰स्नानंस॰॥कामधेनुसमुद्भूतंदुग्धंचामृतमुत्तमम्॥स्नानार्थं-
माहृतंभक्त्यावृक्षराजनमोस्तुते॥आप्यायस्वेतिपयस्नानं॥अश्वत्थना॰पयस्नानंस॰प
यस्नानानंतरं शङ्खोदकस्नानंस॰सकलपूजार्थे अक्षतांस॰॥दध्नाचैवमहादेवस्न पनंक्रिय
तेमय॥दधिवामनरूपेणदधिस्नानायगृह्यतां॥दधिक्राव्णोइतिदधिस्नानं॥अश्वत्थ-
नारा॰दधिस्ना॰स॰दधि॰श॰स॰अ॰स॰॥गोघृतंचमयानीतंदेवानांहविरुत्तमं॥पावनं
सर्वलोकानांस्नानार्थंप्रतिगृह्यतां॥घृतंमिमिक्षेइतिघृतस्नानं॥अश्वत्थना॰घृतस्नानंस॰
घृतस्ना॰शङ्खो॰स॰अ॰स॰॥पुष्पेभ्यःसमादायमक्षिकाभिःकृतंमधु॥स्नानार्थंचप्रयत्नेनम
यादत्तंचगृह्यतां॥मधुवाताइतिमधुस्नानं॥अश्वत्थना॰मधुस्नानंस॰ मधुस्ना॰शङ्खो॰स॰
अक्षतांस॰॥शर्करांचसिताश्रेष्ठाइक्षोरससमुद्भवा॥स्नानार्थंचमयानीतावृक्षराजनमोस्तुते॥
स्वादुःपवस्वइतिशर्करास्नानं॥अश्वत्थना॰शर्करास्ना॰स॰ शर्करास्ना॰शङ्खो॰स॰स॰अक्ष॰स॰
॥गंधद्वारांदुराधर्षांइति गंधोदकस्ना॰स॰ गंधोदकस्ना॰शङ्खोद॰स॰॥पंचोपचारैःपूजनंकुर्या
त्॥अनेन पंचोपचार पूजनेन तेनश्री अश्वत्थना॰प्रीयतांन॰॥उत्तरेनिर्माल्यंविसृजेत्॥ पुरुष
कर्तृके महा अभिषेकस्नाने पुरुषसूक्तं॥स्त्रीकर्तृके पुराण मंत्रः॥महिम्नःपारंतेपरमविदुषोयद्य १
सदृशीस्तुतिर्ब्रह्मादीनामपितदवसन्नास्त्वयिगिरः॥अथावाच्यःसर्व स्वमतिपरिणामावधिगृ

(3A)

णन्मामाख्येषस्तोत्रेहरनिरपवादः परिकरः ॥१॥ अतीतः पंथानंतवचमहिमावाङ्मनसयोरत
द्व्यावृत्यायं चकितमपिधत्तेश्रुतिरपि ॥ सकस्यस्तोतव्यः कतिविधगुणः कस्यविषयः पदेत्वर्वा-
चीनेपततिनमनः कस्यनवचः ॥२॥ मधुस्फीतावाचः इति महिम्नस्तोत्रंपठेत् ॥ मूलतोब्रह्मरूपा
यमध्यतो विष्णुरूपिणे ॥ अग्रतः शिवरूपाय अश्वत्थायनमोनमः ॥ अश्वत्थना० महाभिषे-
कस्नानंस० ॥ सर्वभूषाधिकेदेवलोकलज्जानिवारणे ॥ मयोपपादितेतुभ्यंवाससीप्रतिगृह्यतां
॥ तंयज्ञमितिवस्त्रं ॥ अश्वत्थना० वस्त्रंस० ॥ दामोदरनमस्तेस्तुत्राहिमां भवसागरात् ॥ ब्रह्मसू
त्रंसोत्तरीयंगृहाणपुरुषोत्तम ॥ तस्माद्यज्ञाद्यज्ञोपवीतं ॥ अश्वत्थना० यज्ञोपवीतंसम० ॥ कंचुकिं
स० ॥ कज्जलंस० ॥ उद्यारुणसंकाशंजपाकुसुमसंनिभं ॥ सिंदूरंतेप्रदास्यामिप्रीत्यर्थंप्रतिगृह्य
तां ॥ अश्वत्थना० सिंदूरंस० ॥ अश्वत्थहुतभुग्वासोगोविंदस्यसदाश्रयः ॥ अशेषंहरमेपापंवृक्ष-
राजनमोस्तुते ॥ अश्वत्थना० अलंकारान् स० ॥ मलयाचलसंभूतंघनसारंमनोहरं ॥ हृदयानंद
नंचारुचंदनंप्रतिगृह्यतां ॥ तस्मा० गंधं ॥ अश्व० चंदनंस० ॥ अक्षताश्चसुरश्रेष्ठाः कुंकुमोक्ताः सुशोभिताः
मयानिवेदिताभक्त्यागृहाणपुरुषोत्तम ॥ अश्वत्थना० अक्षतांस० ॥ हरिद्रारंजितादेवीसुखसौ-
भाग्यदायिनी ॥ अतस्त्वांपूजयिष्यामि हरिद्रांप्रतिगृह्यतां ॥ अश्वत्थना० हरिद्रांस० ॥ कुंकुमं-
कांचनंदिव्यंकामिनीकामसंभवं ॥ कुंकुमेनार्चिते देवीगृहण परमेश्वरी ॥ अश्वत्थना० कुंकुमंस०
॥ पट्टसूत्रभवंदिव्यंस्वर्णपूर्णाकृतीयुतं ॥ सौमांगल्याभिवृध्यर्थंकंठसूत्रंददामिते ॥ अश्वत्थना० कं-
ठसूत्रंस० ॥ ताडपत्राणिदिव्यानि विचित्राणिशुभानिच ॥ करभरणयुक्तानि गौरीत्वंप्रतिगृह्यतां ॥
अश्वत्थना० ताडपत्रंस० ॥ स्वभावसुंदरांगीत्वंनानारत्नादिभिर्युतां ॥ भूषणानिविचित्राणिप्रीत्यर्थं

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai joint project

सो.
२

प्रतिगृह्यतां ॥ अश्वत्थना० आभरणंस० ॥ नानासुगंधिकंद्रव्यंचूर्णीकृता प्रयत्न तः ॥ ददामितेन मस्तभ्यंप्रीत्यर्थंप्रतिगृह्यतां ॥ अश्वत्थना० परिमलद्रव्यंस० ॥ काचस्यनिर्मितंदिव्यंकंकणंच सुरेश्वरी ॥ हस्तालंकरणार्थाय कंकणंप्रतिगृह्यतां ॥ अश्वत्थना० कंकणंस० ॥ माल्यादीनिसु गंधीनिमालत्यादीनिवैप्रभो ॥ मयाहृतानिपूजार्थं पुष्पाणिप्रतिगृह्यतां ॥ १ ॥ करवीरैर्जाति कुसुमैश्चंपकैर्बकुलैः शुभैः ॥ शतपत्रैश्चकल्हारैरर्चयेत्परमेश्वर ॥ सेवंतिकाबकुलचंपकपाट- लाब्जपुंन्नागजातिकरवीररसालपुष्पैः ॥ बिल्वप्रवालतुलसीदलमल्लिकाभिस्त्वांपूजयामिज गदीश्वरमेप्रसीद ॥ तस्मादश्वा अजायंतेति पुष्पं अश्वत्थना० पुष्पंस० ॥ अथांगपूजा ॥ केशवायनमः पादौपूजयामि ॥ संकर्षणाय० गुल्फौपूजयामि ॥ कमलात्मनेन० जंघेपूजयामि ॥ विश्वरूपाय० जानू पूज० ॥ प्रद्युम्नायनमः गुह्यंपूज० ॥ विवस्वतेन० कटिंपू० ॥ अग्निरूपाय० नाभिंपू० ॥ परमात्मने० हृदयंपू० ॥ मधुसूदनाय० स्कंधौपू० ॥ श्रीकंठाय० कंठंपू० ॥ सर्वेश्वराय० बाहूपू० ॥ वाचस्पतये० मुखंपू० ॥ विष्णवेनमः करौपू० ॥ पुरुषोत्तमाय० नासिकांपू० ॥ अच्युतायनमः कर्णौपू० ॥ ना रसिंहाय० नेत्रेपू० ॥ वामदेवा० ललाटंपू० ॥ सर्वात्मनेन० शिरःपू० ॥ वृक्षराजाय० सर्वांगंपू० ॥ अ थनामपूजा ॥ अश्वत्थमूलेब्रह्मणेनमः ॥ मध्येविष्णवेन० ॥ अग्रेशिवरूपाय० अमार्येनः सोमा येः० ॥ व्यक्ताव्यक्तस्वरूपाय० ॥ सृष्टिस्थित्यंतकारिणे० ॥ आदिमध्यांतहीनाय० ॥ विष्णवे० ॥ अ श्वत्थायनमः ॥ केशवादिचतुर्विंशतिनामभिः तुलसीपत्राणिस० निर्यासंवृक्षराजानांधूपार्थंकल्प याम्यहं ॥ धूम्ररूपेणवर्ततेधूपोयंप्रतिगृह्यतां ॥ यत्पुरुषंव्यदधुरितिधूपं ॥ अश्वत्थना० धूपंस० ॥ चक्षुर्दंसर्वलोकानांतिमिरस्यनिवारणं ॥ आर्तिक्यंकल्पयेभक्त्या अश्वत्थप्रतिगृह्यतां ॥ ब्रा-

पू.
२

ह्मणोस्यदीपं ॥ अश्वत्थना० एकार्तिक्यदीपंस० ॥ अन्नाद्भवंतिभूतानि अन्नाद्यज्ञः प्रजापतिः
॥ अश्वत्थयज्ञरूपेणनैवेद्यंप्रतिगृह्यतां ॥ चंद्रमामनसइतिनैवेद्यं ॥ अश्वत्थना० नैवेद्यंस० ॥
प्राणायनमः ॥ अपानाय० ॥ व्यानाय० ॥ उदाना० ॥ समानायन० ॥ ब्रह्मणेनमः ॥ नैवेद्यात्पूर्वं
आचमनंस० ॥ मध्येपानीयंस० ॥ उत्तरापोशनंस० ॥ हस्तप्रक्षालनंस० ॥ मुखप्रक्षालनंस० ॥
करोद्वर्तनार्थेचंदनंस० ॥ नागवल्युद्भवंपत्रंब्रह्मणा निर्मितंफलं ॥ कर्पूरैलासमायुक्तं तांबूलं
प्रतिगृह्यतां ॥ अश्वत्थना० तांबूलंस० ॥ हिरण्यगर्भगर्भस्थंहेमबीजंविभावसोः ॥ अनंतपुण्य
फलदमतः शांतिंप्रयच्छमे ॥ अश्वत्थना० सुवर्णपुष्पदक्षिणांस० ॥ इदंफलंमयादेवस्थापितं-
पुरतस्तव ॥ तेनमेसफलावाप्तिर्भवेज्जन्मनिजन्मनि ॥ अश्वत्थना० फलंस० ॥ चंद्रादित्यौच
धरणीविद्युदग्निस्तथैवच ॥ त्वमेवसर्वज्योतींषिआर्तिक्यंप्रतिगृह्यतां ॥ श्रियेजातःइतिमहा-
नीराजनदीपं ॥ अश्वत्थना० महानीराजनदीपंस० ॥ कर्पूरगौरंकरुणावतारंसंसारसारंभुजगेंद्रहा
रं ॥ सदावसंतंहृदयारविंदेभवंभवानीसहितंनमामि ॥ अश्वत्थना० कर्पूरार्तिक्यदीपंस० ॥ लोका
त्मासर्वभूतात्मावेदात्माविश्वतोमुखः ॥ जन्ममृत्युजराव्याधिसंसारभयनाशनः ॥ नाभ्यासीतिपु
ष्पांजलिं ॥ अश्वत्थना० मंत्रपुष्पंस० ॥ यानिकानिचपापानिजन्मांतरकृतानिच ॥ तानितानिविन-
श्यंतिप्रदक्षिणपदेपदे ॥ अन्यथाशरणंनास्ति त्वमेवशरणंमम ॥ तस्मात्कारुण्यभावेनरक्षरक्षपर
मेश्वर ॥ सप्तास्यासंनितिप्रदक्षिणां ॥ अश्वत्थना० प्रदक्षिणांस० ॥ नमःसर्वहितार्थायजगदाधारहे
तवे ॥ उमाकांतायशांताय शंकरायनमोनमः ॥ यज्ञेनयज्ञमयजंतइति नमस्कारः ॥ अश्वत्थनाराय० न
मस्कारंस० ॥ अश्वत्थहुतभुग्वासोगोविंदस्यशिवस्यच ॥ अशेषंहरमेपापंवृक्षराजनमोस्तुते ॥ १ ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(5)

अमायैचनमस्तुभ्यं सौमायैते नमोनमः ॥ उभयोः संगमे विष्णु पूजाफलमवाप्नुयात् ॥ अश्वनाराय
णा॰ प्रार्थनां स॰ ॥ अश्वत्थना॰ गीतं ॥ नृत्यं ॥ वाद्यं ॥ छत्रं ॥ चामरं ॥ दर्पणं ॥ मंचकं ॥ व्यजनं ॥ सर्वरा
जोपचारान् कल्पयेत् ॥ सोमवतीव्रतांगत्वेन अमुकद्रव्येण मूलतोब्रह्मरूपेति मंत्रेण प्रतिपदार्थेन अ
ष्टोत्तरशत अश्वत्थप्रदक्षिणाः करिष्ये ॥ प्रदक्षिणांते तद्द्रव्यं विप्रेभ्यो दद्यात् ॥ आवाहनंनजाना॰
॥ मंत्रहीनंक्रि॰ ॥ अन्यथाशर॰ ॥ गतंपापंग॰ ॥ अनेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारैः सोमवतीव्र
तांगत्वेन अश्वत्थपूजनेन तेनश्री अश्वत्थना॰ प्रीयतांनमम ॥ पूजासमाप्त ॥ अथवायनप्रदानं ॥
अद्यपूर्वोच्चरित॰ पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं अमासोमवतीव्रतांगत्वेन पूजासांगतासिध्यर्थं ब्राह्म-
णाय वायनप्रदानं करिष्ये ॥ तथाच ब्राह्मणपूजां करिष्ये ॥ महाविष्णुस्वरूपिणे ब्राह्मणाय इद-
मासनं ॥ स्वासनं ॥ इदं पाद्यं ॥ सुपाद्यं ॥ इदमर्घ्यं ॥ अस्त्वर्घ्यं ॥ इदमाचमनीयं ॥ अस्त्वाचमनी
यं ॥ गंधाः पांतु ॥ सौमंगल्यंचास्तु ॥ अक्षताः पांतु ॥ आयुष्यमस्तु ॥ पुष्पाणि पांतु ॥ संश्रेयो-
स्तु ॥ तांबूलंपांतु ॥ ऐश्वर्यमस्तु ॥ दक्षिणाः पांतु ॥ बहुदेयंचास्तु ॥ नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये-
सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ॥ सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटीयुगधारिणे नमः ॥ इ-
तिमंत्रेण अक्षतांदद्यात् ॥ उपायनमिदंदेवव्रतसंपूर्णहेतवे ॥ वायनंद्विजवर्याय सहिरण्यंददा-
म्यहं ॥ १ ॥ विप्रायवेदविदुषे श्रोत्रियायकुटुंबिने ॥ नरकोत्तारणार्थाय अच्युतः प्रीयतामिति ॥ २ ॥
इदं वायनप्रदानं ॥ सदक्षिणाकं ॥ सतांबूलं ॥ अमुकशर्मणे ब्राह्मणाय तुभ्यमहं संप्रददे ॥ प्र
तिगृह्यतां प्रतिगृण्हामि तेनश्रीलक्ष्म्यादिब्रह्माविष्णुशिवात्मक अश्वत्थना॰ प्रीयतांनमम ॥ ३
नमस्कारंकुर्यात् ॥ आशीर्वादांते व्रतंसुव्रतमस्तु इति ब्राह्मणो वदेत् ॥ समाप्त ॥

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(5A)

श्रीगणेशायनमः ॥ ॥अथसोमवतीसार्थव्रतकथालिख्यते॥ ॥सूत बोलतात. धर्मोविषयीं चित्त ज्यानें अशा धर्मराजानें बाणांच्या शय्येवर भीष्म प्राप्त जाहले असतां, त्या समीप जाऊन त्यांस नमस्कार करून सर्वांच्या हिताविषयीं भाषण केलें. १ कीं, हे भीष्मा तूं कोप पावलेल्या भीमानें कौरवांतील मुख्य वीर मारले असतां, तसेंच जयशाली अर्जुनानें इतर लोक मारले असतां. २ दुर्योधनाच्या दुष्ट मसलतीनें आमच्या कुळाचा क्षय झाला. व बाल, वृद्ध, आतुर, या वांचून भूमीवर कोणी

सूतउवाच शरतल्पगतंभीष्ममुपागम्ययुधिष्ठिरः कृतप्रणामोधर्मात्माहितंवचन मब्रवीत् १ युधिष्ठिरउवाच हतेषुकुरुमुख्येषुभीमसेनेनकोपिना तथापरेषुभूते षुयुधिनष्टेषुजिष्णुना २ दुर्योधनकुमंत्रेणजातोस्माकंकुलक्षयः नसंतिभुविभू पालाबालवृद्धातुरादृते ३ अवशिष्टावयंपंचवंशेभारतसंज्ञके एकातपत्रमपिच राज्यंमह्यंनरोचते ४ जीवितेपिजुगुप्सामेमृतेनगतिःकचित् इत्थंसंततिविच्छे दसंतापोत्हृदयेनिश ५ अश्वत्थामास्त्रनिर्दग्धउत्तरागर्भसंभवः अतोमेद्विगुणं दुःखंपिंडविच्छेददर्शनात् ६ राजे राहिले नाहींत. ३ भारत वंशांत आह्मी पांच राहिलों. मला एक छत्री असें राज्य मिळूनही रुचत नाहीं. ४ कदाचित् मी वांचलों असतां माझी निंदा होईल; आणि मेल्यानें कधीही चांगली गति प्राप्त होणार नाहीं, माझ्या हृदयांत संततीचा नाश झालेला पाहून निरंतर संताप उत्पन्न होतो. ५ व उत्तरेच्या उदरांत झालेला गर्भ अश्वत्थाम्याच्या अस्त्रानें दग्ध जाहला त्या योगानें पिंड विच्छेद झाला असें मनांत येऊन मलाद्विगुणित दुःख होतें. ६

The Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the ... Joint Project ... Mumbai.

(61)

हे भीष्मा, सांप्रतकालीं मी काय कृत्य करूं. व कोठें जाऊं, जें केलें असतां, तत्काल पुष्कळ दिवस वांचणारी संतति होते, असें कृत्य मला सांगा. ७ भीष्म बोलतात. हे धर्मराजा, तुला व्रतांमध्यें उत्तम व्रत सांगतो. तें ऐक. ज्या व्रताच्या आचरणमात्रानें बहुत दिवस वांचणारी संतति, होते. ८ तें असें कीं, जा वेळेस सोमवारानें युक्त अशी अमावास्या होईल. त्या अमावास्येच्या दिवशीं अश्वत्थाच्या जवळ येऊन, जनार्दनाची पूजा करून, ९ एकशें आठ रत्नें, धातु व फळें किंवा पक्वान्नें या पैकीं कोणतेंहीं एकादें द्रव्य घेऊन, त्या वृक्षा

किंकरोमिक्कगच्छामिपितामहवदाधुना येनसंपद्यतेसद्यः संततिश्चिरजीविनी ७ भीष्मउवाच शृणुराजन्प्रवक्ष्यामिव्रतानांव्रतमुत्तमं यस्याचरणमात्रेणसंततिश्चिरजीविनी ८ अमावास्यायदापार्थसोमवारयुताभवेत् तस्यामश्वत्थमागत्यपूजयित्वाजनार्दनं ९ अष्टोत्तरशतंकुर्यात्तस्मिन्वृक्षेप्रदक्षिणाः तावत्संख्यान्युपादायरत्नधातुफलानिच १० व्रतराजमिमंराजन्विष्णोःप्रीतिकरंपरं उत्तराकारयप्राज्ञगर्भोजीवमवाप्स्यति ११ भविष्यतिगुणीपुत्रस्त्रिषुलोकेषुविश्रुतः श्रुत्वापितामहवचः प्रत्युवाचयुधिष्ठिरः १२ तद्वृतंव्रतराजाख्यंविस्तरेणप्रकाशय केनप्रकाशितंमर्त्येकेनेदंविहितंविभो १३

ला एकशें आठ प्रदक्षिणा घालाव्या. १० हे राजा, तूं सुज्ञ आहेस या करितां उत्तरे कडून विष्णूची अत्यंत प्रीति संपादन करणारा असा हा व्रतराज करविलास म्हणजे तिचा गर्भ वांचेल. ११ नंतर त्रैलोक्यांत प्रसिद्ध असा गुणवान् पुत्र होईल. असें भीष्मांचें वचन ऐकून धर्मराज बोलूं लागले. १२ हे विभो, व्रतराज या नांवाचें तें व्रत या मनुष्य लोकीं प्रसिद्धीस कोणी आणिलें व कोणी के-

(6A)

लें हें मला विस्तारें करून सांगा. १३ भीष्म बोलतात. आपापल्या कर्मा विषयीं आसक्त, अशा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र यानीं युक्त कांति या नांवानें सर्वत्र प्रसिद्ध अशी मोठी नगरी आहे. १४ व जी नगरी कैलास पर्वता सारखीं देवालयें आणि राजमंदिरें यानीं सुशोभित असून, सुंदर वेष धारण करणाऱ्या पुरुषानीं व स्त्रियानीं शोभणारी आहे. १५ व रूपानें किंवा चातुर्यानें श्रेष्ठ अशा वेश्यानीं सुशोभित जसी कुबेराची नगरी अलका व इंद्राची अमरावती. १६ आणि रत्नानीं संपन्न, अग्नीची राजधानी जसी तेजोवती, तसी ती नगरी आहे. त्या नग-

भीष्मउवाच आस्तेयासर्वविख्याताकांतिसंज्ञामहापुरी ब्रम्हक्षत्रियविट्शूद्रैःस्व
स्वकर्मरतैर्वृता १४ रजताचलसंकाशैःसौधसंघैर्विराजिता सुवेषैर्नागरजनैर्नारीभि
रुपशोभिता १५ रूपचातुर्यवर्याभिर्वेश्याभिःसमलंकृता अलकेवकुबेरस्यशक्र
स्येवामरावती १६ तेजोवतीवरत्नाढ्यापावकस्यमहापुरी तत्रराजारत्नसेनोबभूवा
मितविक्रमः १७ तस्यामासीद्विजपत्नीनाम्नाधनवतीशुभा यथार्थनामधेयासाल
क्ष्मीरिवसविग्रहा १८ तस्यांसंजनयामाससप्तपुत्रान्गुणान्वितान् एकांदुहितरं
रम्यांनाम्नागुणवतींनृप १९ कृतदाराश्चतेपुत्राविहरंतियथासुखं कन्याकुमारिका
चासीदनुरूपाप्रियार्थिनी २०

रींत अपरमित पराक्रम ज्याचा, असा रत्नसेन या नावाचा राजा झाला. १७ आणि त्या नगरींत स्वभावानें उत्तम एका ब्राम्हणाची धनवती या नामानें स्त्री होती. आणि तिचें तें नाम यथार्थ असून ती मूर्तिमंत लक्ष्मीच काय! असी दिसत असे. १८ हे राजा त्या ब्राम्हणास धनवतीचे ठायीं गुणानीं संपन्न असे सात पुत्र व सुंदर, गुणवती या नांवाची एक कन्या प्राप्त जाली. १९ त्या ब्राम्हणाचे

मुलगे लग्न झाल्या नंतर मना प्रमाणें स्त्रवानें विहार करूं लागले. व रूपवती अशी कन्या पतीची इच्छा करीत कुमारी असती झाली. २० इतक्या संधींत कोणी एक भिक्षार्थी ब्राह्मण प्राप्त जाह्ला. तो आपल्या तेजानें प्रकाशित मूर्तिमंत अग्नीच काय! असा होता. २१ त्या समयीं तो ब्राह्मण येऊन आशीर्वाद देता झाला. नंतर देवस्वामीच्या सात स्त्रुना मोठ्या त्वरेनें उठून २२ प्रत्येकीन भिक्षा आणून त्या ब्राह्मणास दिली. नंतर त्यानें त्या स्नुषांस अवैधव्य व सौभाग्यसंपत्ति प्राप्त होवो असा आशीर्वाद दिला. २३ नंतर

अत्रांतरे द्विजः कश्चिद्भिक्षार्थी समुपागतः दीप्यमानः स्वतेजोभिर्मूर्तिमानिव पावकः २१
द्वारदेशमुपागत्य प्रयुयोजाशिषं तदा देवस्वामिस्नुषाः सप्त समुत्थाय ससंभ्रमं २२
भिक्षां प्रत्येकमानिन्युर्ददुस्तस्मै द्विजन्मने अवैधव्याशिषं प्रादात्ताभ्यः सौभाग्यसंपदं २३
ततो गुणवती मात्रा प्रेरिता सह भिक्षया विप्राय भिक्षां प्रददे कृत्वा पादाभिवंदनं २४
आशिषं च ददौ विप्रो शुभे धर्मवती भव वैलक्षण्यं गुणवती श्रुत्वा प्रत्याययौ गृहं २५
मात्रे निवेदयामास आशिषं तेन या जता श्रुत्वा धनवती पुत्रीं करे धृत्वा समाययौ २६

मातोश्रीच्या प्रेरणेनें गुणवतीही भिक्षा घेऊन, ब्राम्हणा समीप जाऊन, त्याच्या चरणकमलास नमस्कार करून तिनें त्यास भिक्षा दिली. २४ नंतर त्या ब्राह्मणानें शुभे धर्मवती हो, असा आशीर्वाद दिला. नंतर गुणवती पूर्वीच्या आशीर्वादापेक्षां आपल्यास दिलेला आशीर्वाद विलक्षण ऐकून घरामध्यें येऊन. २५ तिनें आपल्या मातेस त्या ब्राम्हणानें दिलेला आशीर्वाद सांगितला. तो ऐकतांच धनवती आपल्या मुलीस हातीं धरून ब्राह्मणा जवळ आली. २६ ७ ७ ७ ७ ७

(7A)

नंतर धनवतीनें मुली कडून ब्राम्हणास पुनः नमस्कार करविला. त्या ब्राम्हणानें पुनः तसाच आशीर्वाद बोलून तिचें अभिनंदन केलें. २७ धनवतीनें तो आशीर्वाद ऐकून, चिंताक्रांत होऊन बोलूं लागली. धनवती म्हणत्ये हे ब्राम्हणा, तूं ज्ञानी आहेस म्हणून माझें वचन मनांत आण. २८ हे ब्राम्हणा, माझ्या सुनानीं नमस्कार केला असतां त्यांस ज्यांच्या योगानें अवैधव्य, सुख, सौभाग्य, पुत्र, प्राप्त होतात असे उत्तम आशीर्वाद तुम्ही दिले. २९ माझ्या कन्येनें तुम्हास नमस्कार केला असतां, तुम्ही विपरीत भाषण केलें. तें असें कीं, हे

प्रणतिंकारयामासपुनस्तस्मैद्विजन्मने तथैवाशिषमुच्चार्यविप्रस्तामभ्यनंदयत् २७
श्रुत्वाशिषंधनवतीसाचिंताप्रकुवानह धनवत्युवाच प्रसीदभगवन्विप्रवचनंमे
वधारय २८ स्नुषाभ्यः प्रणताभ्योमेत्वयादत्तावराशिषः अवैधव्यकराविप्रसुखसौ
भाग्यपुत्रदाः २९ सुतायांप्रणतायांमेविपरीतंत्वयोदितं भद्रेधर्मवतीभूया इत्युदीर्य
पुनः पुनः ३० आशीः प्रयुक्ताविप्रर्षेकारणंवदसत्वरं द्विजउवाच धन्यासित्वंधन
वतिप्रख्यातचरिताभुवि ३१ यथायोग्याप्रयुक्तेयंमयाशीर्दुहितुस्तव इयंसप्तपदी
मध्येविधवात्वमवाप्स्यति ३२ धर्माचरणमत्यर्थंकर्तव्यमनयाशुभे अतोमया
शीर्दत्तेयंशुभेधर्मवतीभव ३३

कल्याणि, तूं धर्मवती हो म्हणून वारंवार बोलून, ३० तिला आशीर्वाद दिला कीं, हे ब्रम्हर्षे, माझ्या कन्येसच असा आशीर्वाद देण्याचें कारण काय ? तें त्वरित सांगा. ब्राम्हण म्हणतो हे धनवति, तुझें आचरण भूमीवर प्रख्यात आहे या कारणानें तूं धन्य आहेस. ३१ मी तुझ्या मुलीस यथा योग्य आशीर्वाद दिला. कारण ह्या मुलीस सप्तपदीमध्यें वैधव्य प्राप्त होणार आहे. ३२ याजक

Mandal, Dhule and the

रितां हे कल्याणि, या मुलीनें पुष्कळ धर्माचरण करावें, म्हणून मी या मुलीस शुभे धर्मवती भव. हा आशी-
र्वाद दिला. ३३ असें त्या ब्राम्हणाचें भाषण ऐकून, धनवतीचें अंतःकरण चिंताक्रांत झालें. नंतर ती ब्राम्हणा-
स वारंवार नमस्कार करून दीन वचन बोलूं लागली ३४ हे दयानिधे हे ब्राम्हणा, माझ्या मुलीचें वैधव्यजा-
ण्याचा उपाय जाणत असल्यास दया करून सांगा. आपण अपायच मात्र जाणत असल्यास मी का-
य करूं ? ३५ ब्राम्हण बोलतो. हे सुंदरी, तुझ्या घरीं सोमा जर येईल, तर तिच्या पूजनमात्रानें या मुली

श्रुत्वाधनवतीवाक्यंचिंताकुलितचेतसा उवाचवचनंदीनंप्रणिपत्यपुनः पुनः ३४
धनवत्युवाच उपायंवेत्सिविप्रेंद्रवदशीघ्रंदयांकुरु अपायमेववेत्सिचेत्किंकरोमि
दयानिधे ३५ द्विजउवाच आगमिष्यतियदासोमागृहेवैतवसुंदरि तस्याःपूज-
नमात्रेणभवेद्वैधव्यनाशनं ३६ धनवत्युवाच कासासोमात्वयाप्रोक्ताकोजा-
तिःकुत्रसंस्थितिः यस्यागमनमात्रेणभवेद्वैधव्यभंजनं ३७ एतद्वदमहाभागना-
कालोविस्तरस्यमे द्विजउवाच सोमासारजकीजात्यास्थितिस्तस्याश्चसिंहले
३८ साचेदायातितेवेश्मतदावैधव्यभंजनं इत्युक्त्वाब्राम्हणोन्यत्रगतोभिक्षाप्र-
तीक्षया ३९

चें वैधव्य नाश पावेल. ३६ धनवती बोलते. जिच्या येण्यानेंच या कन्येचें वैधव्य न-
ष्ट होईल, असी तुम्हीं सांगितलेली ती सोमा कोण व तिची जाति कोणती ? आणि ती रहाती कोठें ?
३७ हें वर्तमान मोठे भाग्यशाली असे तुम्ही मला लवकर सांगा ! ब्राम्हण बोलतो. ती सोमा, जातीची
रजकीण असून, तिची स्थिति सिंहलद्वीपांत आहे. ३८ ती जर तुझ्या घरीं येईल तर, या कन्येचें वै-

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(8A)

धव्य नाहीसें होईल, असें बोलून तो ब्राम्हण, भिक्षे करितां दुसरेकडे गेला. ३९ त्या समयीं धनवतीही मुलां स बोलूं लागली. हे पुत्रहो, ही तुमची बहीण गुणवती, चांगली आहे, परंतु इचें दैव फार वाईट आहे. ४० सोमेच्या आगमन मात्रानें या बहिणीच्या वैधव्याचा नाश होईल. जो मातोश्रीच्या भाषणानें गौरव बाळ-गतो व ज्यास पित्याची भक्ति आहे. ४१ तो बहिणीसहवर्तमान सोमेस आणावया करितां लवकर जावो. पुत्र म्हणतात मातोश्री तुझें अंतःकरण सर्वकाल मुलीच्या स्नेहाधीन आहे, ४२ म्हणून तूं पुत्रहो अ-

धनवत्यपिपुत्रेभ्यःप्रोवाचवचनंसदा धनवत्युवाच इयंदुर्ललितापुत्राःस्वसागु णवतीशुभा ४० सोमागमनमात्रेणवैधव्यभंजनं अस्तियस्यपितुर्भक्तिर्मातुर्वचन गौरवं ४१ सयातुसहस्वस्रासोमामानयितुंद्रुतं पुत्राऊचुः ज्ञातंमातस्त्वतस्त्वां तंपुत्रीस्नेहवशंसदा ४२ यातदेशांतरंपुत्राःप्रख्यापयसिदुर्गमं अंतरेदुस्तरःसिंधुः शतयोजनविस्तरः ४३ अशक्यंगमनंतत्रनक्षमागमनेवयं देवस्वाम्युवाच अ पुत्रः ससभिःपुत्रैरहंयास्यामिसिंहलं ४४ आनयिष्यामितांसोमांपुत्रीवैधव्यना शिनीं एवंवादिनिसक्रोधेदेवस्वामिनितत्क्षणे ४५

वघड अशा देशांतरास जा असें बोलून आम्हांस पाठवितेस. परंतु मध्यभागीं चारशें कोश रुंदीचा दुस्तर समुद्र आहे. ४३ आणि त्या स्था नीं गमन करणें अशक्य, या करितां आम्ही जाण्यास समर्थ नाहीं, असें मुलांचें वाक्य श्रवण करून त्या कालीं त्या मुलांचा पिता देवस्वामि बोलतो कीं, सात पुत्र असून अपुत्रा सारिखा, मीच सिंहलद्वीपास जा तों. ४४ आणि कन्येच्या वैधव्याचा नाश करणारी जी सोमा तीस आणतो. असा त्या कालीं रागानें देवस्वा

मी बोलत असतां, ४५ धाकटा मुलगा शिवस्वामी नम्र होऊन बोलतो. हे पित्या, रागाच्या स्वाधीन होऊन असें तूं बोलूं नको. ४६ मी असतां दुसरा सिंहलद्वीपास जाण्याला कोण समर्थ आहे ? असें बोलून तो एका एकीं उठला, आणि आनंदानें मस्तक चरणीं ठेऊन, ४७ नंतर तो भगिनीस बरोबर घेऊन, सिंहलद्वीपास जाण्या करितां निघाला. पुढें तो कांहीं दिवसानीं समुद्राच्या तीरीं प्राप्त झाला. ४८ तो ब्राम्हण, त्या समुद्रास पाहून तरून जाण्याविषयीं कल्पना करीत आहे, तों त्यानें समीपभागीं अत्यंत विस्तीर्ण असा

शिवस्वामीकनिष्ठस्तुपुत्रः प्रोवाचसन्नतः तातमावदएवंत्वंरोषावेशवशंगतः ४६
मयितिष्ठतिकः शक्तोगंतुंद्वीपंहिसिंहलं इत्युक्त्वासहसोत्थायप्रणम्यशिरसामुदा ४७
प्रतस्थेसहसास्वस्त्राद्वीपंसिंहलसंज्ञितं सक्रियद्भिर्दिनैर्गत्वातीरंप्रापसरित्पतेः ४८
तंतर्तुमंबुधिंदृष्ट्वाकल्पनामकरोद्द्विजः सददर्शमहाविस्तीर्णंन्यग्रोधद्रुममंतिके ४९ त
त्कोटरेस्मरवासीनागृध्रराजस्यबालकाः तस्मादपतलेस्थित्वाताभ्यांनीतंतुतद्दिनं ५०
शावकानांकृतेगृध्रोगृहीत्वाशिशुभोजनं भोजनंदत्तमपितेनस्मभुंजंतशावकाः ५१
पप्रच्छबालकान्गृध्रोचिंताकुलितमानसान् गृध्रराजउवाच कथंनभुंजतेपुत्रा
भवंतःक्षुधिताअपि ५२

वट वृक्ष पाहिला. ४९ तों त्या वृक्षाच्या कोरुयांत गृध्रपक्ष्याचीं पिलें स्मरवानें बसलेलीं होतीं, त्या वृक्षाखालीं राहून त्या उभयतानीं तो दिवस घालविला ५० गृध्रपक्ष्यानें पिलां करितां भोजन करण्यास योग्य असें भक्ष्य आणून त्यांस दिलें असतांही तीं बालकें भक्षण करीनात. ५१ नंतर गृध्र पक्ष्यानें चिंताक्रांत अंतःकरण झालेल्या मुलांस प्रश्न केला कीं, बालकहो, तुम्हास



"Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

क्षुधा लागली असून कां भोजन करीत नाहीं ५२ मी तुम्हास भोजन करण्याविषयीं योग्य व कोमळ अ
सें मांस आणलेलें आहे. मुलें म्हणतात. हे पित्या, ह्या झाडा खालीं अत्यंत क्षुधित दोन मनुष्यें आहेत.५३
त्यानीं भोजन केल्यावांचून आम्ही कसें जेवावें ! इतकें भाषण ऐकून गृध्राच्या अंतःकरणांत दया आली
५४ नंतर तो गृध्र त्यांच्या जवळ येऊन वचन बोलतो कीं, हे ब्राम्हणा तुझा मनोरथ काय आहे तो मला
सांग म्हणजे तत्काल पूर्ण झालाच असे समज. ५५ याकरितां हे ब्राम्हणा तूं भोजन कर, म्हणजे आम्ही

आनीतंकोमलंमांसंभवद्योग्यमिदंमया शावकाऊचुः एतद्वृक्षतलेतातमानवौ
क्षुधितौभृशं ५३ ताभ्यामस्वीकृतेतातकथंभुंजामहेवयं एतच्छ्रुत्वासगृध्र
स्तुकरुणागतचेतनः ५४ तयोरंतिकमागत्यवचनंसमभाषत ज्ञातस्तुयुव
योःकामोवक्तव्योत्रममद्विज ५५ क्रियतेसर्वथाविप्रभोजनंकर्तुमर्हसि द्विज
उवाच सिंहलेगंतुकामोहंजलधेःपारमद्यवै ५६ सोमागमनमिच्छामिस्वस्र
वैधव्यनाशनं गृध्रराजउवाच पारमुत्तारयिष्यामिजलधेःप्रातरेवहि ५७
सोमागृहमपितवदर्शयिष्यामिसिंहले ततोरात्र्यांव्यतीतायांउदितेतुदिवाकरे
५८

ही भोजन करूं. शिवस्वामी म्हणतो, मी समुद्राच्या पार सिंहलद्वीपांत जाण्याची इच्छा करीत आहें. ५६ आणि बहिणीच्या वैधव्याचा नाश करणारी जी सोमा तिच्या येण्याची इच्छा करितों.
गृध्रराज म्हणतो, प्रातःकालींच समुद्राच्या पलीकडे तुला नेईल ५७ आणि सिंहलद्वीपांत सोमेचें घर
ही दाखवीन. नंतर ती रात्र जाऊन सूर्य उदयास आला असतां, ५८

(161

गृध पक्ष्यानें मोठ्या वेगें करून समुद्राच्या पार नेऊन त्यांस उतरविलें, नंतर ते सिंहलद्वीपांत जाऊन सोमेच्या घराजवळ उभे राहिले. ५९ नंतर प्रातःकालीं त्यानीं रोजच्यारोज तिच्या अंगणाचें झाड सारवण करावें. ६० या प्रमाणें तिच्या घरीं करीत असतां त्यांस पूर्ण एक वर्ष गेलें. नंतर सोमेनें आश्चर्ययुक्त होऊन आपल्या स्नुनांस व पुत्रांस प्रश्न केला ६१ कीं, झाडणें व सारवणें कोण करतो! तें मला सांगा. असें सोमेनें भाषण ऐकून एककालींच ते सर्वही बोलले कीं, आम्ही तें जाणत नाहीं.

पारसुत्तारितौतौतु गृध्रराजेनवेगिना सिंहलद्वीपमागत्यस्थितौसोमागृहांतिके ५९
ततः प्रत्यूषसमयेसम्मृज्यांगणमंडलं लेपनंचक्रतुस्तस्यादिवसंदिवसंप्रति ६० ए
वंविदधतोस्तत्रपूर्णः संवत्सरोगतः स्नुषाः पुत्रान्समाहूयसोमापप्रच्छविस्मिता ६१
मार्जनंलेपनंकोत्रकरोतिममकथ्यतां एकदैवाथजगदुः नजानेविस्मितावयं ६२ त
तः कदाचिद्व्रजकोसोमावेसंस्थितानिशि ददर्शब्राह्मणीं कन्यांमार्जयंतीगृहांगणं
६३ लिंपंतंअंगणप्रांतंभ्रातरंचकृपामतं सोमापप्रच्छतौगत्वाकौयुवांकथ्यतांमम
६४ ऊचतुस्तौतदासोमायुवांब्राम्हणपुत्रको सोमोवाच दग्धास्मिबतनष्टास्मि
ब्राम्हणोगृहमार्जको ६५

म्हणून आश्चर्य पावत आहों. ६२ नंतर कोणे एके समयीं रात्रीं सोमा परटीण उभी राहिली होती, तों तिनें आपल्या घराचें अंगण झाडणारी ब्राम्हणाची कन्या पाहिली. ६३ आणि शकृद् ज्याचें व्रत असा तिचा बंधूही अंगण सारवित असतां पाहिला. नंतर ती सोमा त्या दोघांजवळ जाऊन तुम्ही कोण आहां तें मला सांगा! असा प्रश्न करिती जाहली. ६४ त्या समयीं ते सोमेप्रत बोल



Joint project of The Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(10A)

ले कीं आम्ही ब्राम्हणाचीं मुलें आहोंत. सोमा म्हणाले, ब्राम्हण जिच्या घरीं झाडणारे झाले. ती मी दग्ध
व नष्ट आहें. ६५ हे ब्राम्हणा, मुळची मी जातीची परटीण पापी म्हणून प्रसिद्ध आहें, त्यांत तुम्ही हें पा
प घडविलें त्या योगानें मी निःसंशय कुत्सित गतीस सर्वथा जाईन. ६६ तूं ब्राम्हण होऊन मला वि
रुद्ध असें करण्याचें कसें इच्छितोस? शिवस्वामी बोलतो. सुंदर कटी असी ही माझी गुणवती या

कांगतिंव्रतयास्यामिपापादस्मादसंशयं पापजातिरहंख्यातारजकीसर्वथाद्विज
६६ कथंत्वंब्राह्मणोभूत्वाविरुद्धंमेचिकीर्षसि शिवस्वाम्युवाच एषागुणवती
नामस्वसाममसुमध्यमा ६७ अस्याःसप्तपदीमध्येवैधव्यंसंप्रपत्स्यते तवसा
न्निध्यमात्रेणभवेद्वैधव्यभंजनं अतोहेतोःसहस्वस्त्रादासकर्मकरोमिते ६८
सोमोवाच अतःपरंनकर्तव्यंयास्यामितवशासनात् इत्युक्त्वागृहमागत्यस्नु
षाभ्यःप्रत्युवाचह ६९ यःकश्चिन्ममराज्येस्मिन्म्रियतेमानवःक्वचित् न
थैवरक्षणीयोसौयावदागम्यतेमया ७० कस्यचिद्वचनात्कोपिनदग्धव्यःकथंच
न तथेत्युक्त्वास्नुषाभिःसासोमायातामहांबुधिं ७१ नांवाची बहीण आहे ६७ इला
सप्तपदी मध्यें वैधव्य प्राप्त होणार व तुझ्या सान्निध्यानेंच वैधव्याचा नाश होईल. या हेतूस्तव बहि-
णी सहित मी तुझे घरीं सेवा करतों. ६८ सोमा बोलते. हे ब्राम्हणा, अतः पर तूं हें कर्म करूं नकों
तुझ्या आज्ञेनें मी तुझ्या घरीं येईन; इतकें बोलून ती आपल्या घरांत येऊन स्नुनाशीं बोलूं लागली.
६९ मुलींनों या राज्यांत कदाचित् माझा मनुष्य मेला तर माझें येणें होई तों पर्यंत तो नसाच रक्षण

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

सोम. करून ठेवावा. ७० कोणाच्या वचनानें कोणींही दग्ध करूंनये. सुनानीं बरें आहे, असें म्हणण्या ब- सा. क.
. १ रोबर ती सोमा महासमुद्रास गेली. ७१ नंतर त्या ब्राम्हणाच्या मुलांस क्षणांत समुद्राच्या पार उत-
(11) र विले. आणि ती आपण आकाश मार्गानें समुद्र उतरून गेली. ७२ नंतर तिच्या प्रतापानें एका
निमेषांत सर्वही कांति पुरींत प्राप्त झाले. नंतर धनवतीनें सोमेस पाहून संतुष्ट होऊन तिची पूजा ती
करूंलागली. ७३ इतक्या संधींत शिवस्वामी त्यासमयीं देशांतरांतून आपल्या भगिनीस योग्यवर आ

पारमुत्तारयामासक्षणेनद्विजपुत्रको स्वयमाकाशमार्गेणसाततारमहार्णवं ७२
प्राप्ताःकांतिपुरींसर्वेनिमेषात्तत्प्रभावतः सोमांदृष्ट्वाधनवतीहृष्टापूजामथाकरोत्
७३ अत्रांतरेशिवस्वामीतदादेशांतरात्स्वसुः सदृशंवरमानेतुंजगामोज्जयिनीं
प्रति ७४ आनीयचवरंतत्रदेवशर्मसुतंसुधीः ब्राम्हणंरुद्रशर्माणंगुणिनंसदृशं
स्वसुः ७५ ततःसारजकीसोमावैवाहिकमथाकरोत् सुलग्नेचसुनक्षत्रेदेवस्वा-
मीतुकन्यकां ७६ ददौतस्मैगुणवतीगुणिनेरुद्रशर्मणे ततोवैवाहिकैर्मंत्रैर्हूयमा
नेहुताशने ७७

णण्या करितां उज्जयिनीस गेला. ७४ नंतर तेथून बुद्धिमान् अशा शिवस्वामीनें
आपल्या बहिणी सारिखा गुणी असा वर देवशर्म्याचा पुत्र रुद्रशर्मा नावांचा ब्राम्हण आणिला. ७५ नंतर
त्या सोमा परटीणीनें लग्नसंबंधि कर्म केलें; आणि देवस्वामीनें उत्तम राशि, लग्न व उत्तम नक्षत्र असतां
आपली कन्या. ७६ गुणवती, गुणी अशा रुद्रनामक ब्राम्हणास दिली. नंतर वैवाहिक मंत्रानीं अग्नींत ९
होम होत असतां. ७७

Mandal, Dhule and the

(11A)

सप्तपदीच्या मध्यभागीं त्या समयीं रुद्रशर्मा ब्राम्हण मरण पावला. नंतर सर्व बांधव रुदन करूं ला
गले, सोमा मात्र अंतःकरणांत खेद न करितां राहिली. ७८ संपूर्ण लोक पहात असतां मोठा आक्रो
श झाला. नंतर त्या सोमेनें गुणवती करितां त्वरित व्रतराजाच्या प्रभावानें उत्पन्न झालेलें ७९ व मृ-
त्यूचा नाश करणारें अशा पुण्याचा यथा विधीनें संकल्प करून दान केलें. नंतर रुद्रशर्माही त्या व्रतराजा
च्या प्रभावानें, ८० जीवन पावून निजलेल्या मनुष्या सारिखा उठून बसला. या प्रमाणें विवाह संपादनक

ततः सप्तपदीमध्येरुद्रशर्माम्रियतस्तदा रुरुदुर्बांधवाः सर्वेस्थितासोमानिराकुला
७८ आक्रंदः सुमहानासील्लोकानांतत्रपश्यतां गुणवत्येचसात्पूर्णंव्रतराजप्रभाव
जं ७९ पुण्यंसंकल्प्यविधिवद्ददौमृत्युविनाशनं रुद्रशर्मापितस्माच्चव्रतराजप्रभा
वतः ८० आससादतदाजीवंसुप्तवत्सहसोत्थितः एवंविवाहंनिर्वर्त्यव्रतराजंनि
वेद्यच ८१ आमंत्र्यतांधनवतींसोमाप्रायाद्गृहंप्रति एवंसारजकीसोमाजीवयि
त्वामृतंद्विजं ८२ चचालहर्षसंपूर्णापूर्णकामास्वमंदिरं अत्रांतरेगृहेतस्याःप्र
थमंतनयोमृतः ८३ पुनःस्वामीमृतस्तस्याजामाताचततोमृतः आगच्छंत्यास्त
दातस्याःसोमवारान्वितातिथिः ८४

रून तिनें व्रतराजही त्यांस सांगितला. ८१ नंतर सो
मात्या धनवतीस विचारून आपल्या घरांस गेली. या प्रमाणें ती सोमापरटीण मेलेल्या ब्राम्हणास जिवंतक
रून. ८२ पूर्ण मनोरथ असी ती हर्षानें पूर्ण होऊन आपल्या मंदिरास निघाली. तों इतक्या संधींत घरींति
चा प्रथम पुत्र मृत जाहला. ८३ आणि तिचा पतीही मरण पावला. नंतर तिचा जामात मृत्यु पावला

नों ती आपल्या घरीं येत असतां, सोमवारानें युक्त असीअमावास्या तिथि प्राप्त झाली. ८४ जीस मृतझालेल्या मनुष्यास संजीवन करणारी तिथि म्हणतात. नंतर तिनें कोणी एक वृद्धस्त्री त्या समयीं मार्गांत येणारी पाहिली. ८५ ती असी कीं, कापसाच्या भारानें पीडित जाहलेली; आणि अति दुःखानें आक्रोश करीत आहे, असी ती वृद्ध स्त्री बोलते, हे मुलि, माझ्या शिरावरचा कापसाचा भार खालीं उतर. ८६ ह्या ओझ्यानें आज माझ्या मस्तकास बहुत पीडा होत आहे. सोमा बोलते हे

अमावास्याबभूवाथमृतसंजीवनीतिथिः सादृदर्शततोयांतींवृद्धांकांचित्
स्त्रियंतदा ८५ तूलभारभराक्रांतांक्रंदमानांसुदुःखिता वृद्धोवाच अव
तारयमेपुत्रितूलभारशिरस्थितं ८६ अनेनशिरसोमेद्यबहुपीडाचजायते
सोमोवाच अमावास्याद्यमेवृद्धे सोमवारयुतातिथिः ८७ तूलकंनस्पृशा
म्यद्यनियमोयंमयाकृतः पुनर्ददर्शयांतींसामूलभारवतींस्त्रियं ८८ साप्यवा
चततःपुत्रिमूलभारोमहानिति अवतीर्यक्षणंतिष्ठसंगेयास्याम्यहंतव ८९ सो
मोवाच अद्यमूलंतथातूलंनस्पृशामिकथंचन ततोश्वत्थतरुंप्राप्यनदीतीरभ
वंपथि ९०

वृद्धस्त्रिये आज सोमवारानें युक्त अमावास्या तिथि आहे. ८७ तर आज मला कापसाला स्पर्श करावयाचा नाहीं असा नियम केला आहे असें बोलून पुढें जातांना आणीक तिनें मुळ्याचें ओझें डोकीवर घेऊन येणारी एक स्त्री पाहिली. ८८ नंतर तीही बोलते. हे मुली, मुळ्यांचा भारा मोठा आहे, तर हा खालीं उतरून क्षणभर उभी रहा म्हणजे तुझ्या बरोबर मीही येतें. ८९ सोमा बोलते, आज मुळ्याला १०

Joint project of the Rajwade Samshodhak Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

किंवा कापसाला मी स्पर्श करीन नाहीं, असें बोलून नंतर ती मार्गांत नदीतीरीं उत्पन्न झालेल्या अश्व
त्थ वृक्षाजवळ आली. १० नंतर स्नान करून विष्णूचें पूजन केलें व मोठें भाग्य जीचें अशा सोमेनें वा
ळू घेऊन त्याच समयीं अष्टोत्तर शत प्रदक्षिणा केल्या. ११ भीष्म बोलतात. ज्या समयीं वाळू हातांत
घेऊन तिनें प्रदक्षिणा केल्या त्या वेळेस जामात पति आणि पुत्र ते सर्वही जीवंत झाले. १२ व तिचें
रहाण्याचें नगर लक्ष्मीनें युक्त झालें आणि तिच्या घरांत तर बहुतच लक्ष्मी प्राप्त झाली. नंतर मोठी

स्नात्वाविष्णुंसमभ्यर्च्यशर्कराभिः प्रदक्षिणां साचकारमहाभागातदेवाष्टोत्तरं
शतं ११ भीष्मउवाच यदाप्रदक्षिणावर्तंकृतंशर्करहस्तया तदाजीवितवं
तस्तेजामातृपतिपुत्रकाः १२ नगरंश्रीसमाकीर्णंतद्गृहंचविशेषतः अथायाता
महाभागासोमास्वभुवनंप्रति १३ जीवितंवीक्ष्यभर्तारं पुत्रंजामातरंततः तान्
समासाद्यसासोमाजगामकृतकृत्यतां १४ प्रणिपत्यस्नुषाः सर्वाःप्रपच्छुस्तांतप
स्विनीं स्नुषाऊचुः मृतास्तेतनयादेविपतिर्जामातृपुत्रकाः १५ जीवितास्तेकथं
देविकेनपुण्येनतद्वद सोमोवाच गुणवत्यैमयादत्तंव्रतराजस्यपुण्यकं १६

भाग्यवती सोमा आपल्या मंदिरीं येऊन, १३ आपला पति जिवंत झालेला व तसाच जामात आणि पुत्र
यांस पाहून त्यांच्या जवळ येऊन कृतकार्य झाली. १४ पुढें सर्व स्नुषा, तपानें संपन्न अशा त्या सोमे
स नमस्कार करून प्रश्न करूं लागल्या हे देवि, तुझी कन्या, पति, जामात, व पुत्र हे मृत जाहलेले असून, १५
कोणत्या पुण्यानें जीवन पावले, तें आम्हास सांग ? सोमा बोलते, गुणवतीस म्या व्रतराजाचें पुण्य

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan

दिलें. ९६ त्याच्या परिणामानें पति, जामात, पुत्र, हे मरण पावले. म्या कापसाला, तसाच मूलकास स्प-
र्श केला नाहीं. ९७ अश्वत्थ वृक्षांत विष्णूचें पूजन करून त्या वेळेस तेथें वाळू हातांत घेऊन मी अ
ष्टोत्तरशत प्रदक्षिणा केल्या. ९८ त्या कर्माच्या प्रभावानें पति, जामात, पुत्र हे जीवन पावले. या करि
तां तुम्ही सर्वही यथा विधीनें आजपासून हा व्रतराज करा. ९९ म्हणजे तुम्हास वैधव्य येणार ना-
हीं व सौभाग्य प्राप्त होईल, असें बोलून तसेंच ती सोमा, स्नुनांकडून हा व्रतराज करविती झाली. १००

मृतास्तेनहिपाकेनपतिर्जामातृपुत्रकाः तूलकंनमयास्पृष्टंमूलकंचतथाअपि ९७
अश्वत्थेविष्णुमभ्यर्च्यतदातत्रप्रदक्षिणं शर्कराहस्तयातत्रकृतमष्टोत्तरंशतं ९८
जीवितास्तत्प्रभावेनपतिजामातृपुत्रकाः सर्वाभिःक्रियतामद्यव्रतराजोविधानतः
९९ भविष्यतिनवैधव्यंसौभाग्यंसंभविष्यति स्नुषाभिःकारयामासतथासोमव्र
तेश्वरं १०० भुक्त्वाभोगान्बहूंस्तत्र पुत्रपौत्रादिभिःसह तैश्चसर्वैःपरिवृताविष्णु
लोकमवापसा १ इत्येतत्कथितंपार्थ विस्तरेणमयातव युधिष्ठिरउवाच मा
हात्म्यंव्रतराजस्यकोविधिर्वदविस्तरात् २ कर्तव्यंकेनभीष्मेदंनारीभिःपुरुषेणवा
भीष्मउ० अमावास्यातिथिःपार्थसोमवारान्वितायदा ३ नंतर तेथें पुत्र पौत्रादिकां सहित

बहुत भोग भोगून त्या सर्वांसि घेऊन ती सोमा, विष्णुलोकांस प्राप्त झाली. १ भीष्म म्हणतात. हे धर्मा, वि
स्तारानें मी तुला या प्रमाणें हें व्रत सांगितलें. धर्मराज बोलतात, व्रतराजाचें माहात्म्य व त्याचा विधि
कोणता ? हें विस्तारानें कथन करा. २ हे भीष्मा, हें व्रत स्त्रिया किंवा पुरुष यांत कोणी करावें ? भीष्म बो

(13A)

ळतात. हे धर्मा, ज्यावेळेस सोमवारानें युक्त असी अमावास्या तिथि येत्ये. ३ त्या वेळेस देवांसही दुर्लभ अति
शय पुण्यकारक काळ होतो. त्या दिवसीं प्रातःकालीं उठून व्रतकर्त्यानें जलाशयांत स्नान करावें. १०४मौ
नानें स्नान केल्या नंतर व्रती जो याणें पीतांबर नेसून हे धर्मा, अश्वत्थाच्या समीप जावें. ५ नंतर अ
श्वत्थ मूलाचे ठायीं मंत्र पुरःसर विष्णुपूजा करावी. त्या मंत्राचा अर्थ प्रगट व अप्रगट स्वरूप ज्यानें; आ
णि सृष्टि स्थिति व नाश करणारा, ६ उत्पत्ति व मध्य स्थिति आणि नाश ज्यास नाहीं, अशा विष्णूस नम

तदापुण्यतमः कालोदेवानामपिदुर्लभः प्रातरुत्थायव्रतिनास्नानंकार्यंजलाशये ४
स्नात्वामौनेनकौशेयंपरिधायव्रतीततः गत्वाचाश्वत्थवृक्षस्यसमीपंकुरुनंदन ५ अ
श्वत्थमूलेकर्तव्याविष्णुपूजासमंत्रकं व्यक्ताव्यक्तस्वरूपायसृष्टिस्थित्यंतकारिणे
६ आदिमध्यांतहीनायविष्टरश्रवसेनमः विष्णुपूजामंत्रोयं मूलतोब्रम्हरूपाय
मध्यतोविष्णुरूपिणे ७ अग्रतःशिवरूपायअश्वत्थायनमोनमः एवंसंपूज्यगोविं
दंपीतवस्त्राक्षतैःफलैः ८ कुसुमैर्विविधैर्भक्ष्यभोज्यैस्तथाविधैः अश्वत्थपूज
नंकार्यंप्रोक्तमंत्रेणपांडव ९

स्कार असो. या प्रमाणें मंत्रार्थ मनांत आणून विष्णूचें पूजन करा-
वें. मूलभागीं ब्रम्हरूप आणि मध्यभागीं विष्णुरूप, ७ अग्रभागीं शिवरूप अशा अश्वत्थास नमस्कार असो,
हा अश्वत्थ पूजेच्या मंत्राचा अर्थ मनांत आणून विष्णुपूजेच्या मंत्रानें पिवळीं वस्त्रें, अक्षतां, फलें यानीं
गोविंद पूजन करावें. ८ हे धर्मा सांगितलेल्या मंत्रानेंनाना प्रकारच्या पुष्पानीं तसेंच अनेक प्रकारच्या भ
क्ष्य भोज्य पदार्थानीं अश्वत्थ पूजन करावें. ९

 

१२ नंतर अग्नीची वस्ति ज्यामध्यें आणि गोविंदाचा सर्वदा आश्रय ज्यास व वृक्षराज ज्यास म्हणतात असा
जो तूं अश्वत्थनारायण त्या तुला नमस्कार असो. असें बोलून प्रार्थना करावी कीं, माझें संपूर्ण पाप तूं ह
रण कर! ११० या प्रमाणें पूजा विधि करून नंतर प्रदक्षिणा कराव्या. मोतीं, सोनें व रुपें याचीं व तसेच हिरे.
११ कांशाचीं अथवा तांब्याचीं पात्रें पक्कान्नानीं भरून निरनिराळीं घेऊन सावकाशपणीं प्रदक्षिणा होई-
ल असें फिरावें. १२ परंतु तें असें कीं, अष्टोत्तरशत प्रदक्षिणा होई तों पर्यंत फिरावें. आणि समर्पित जें द्र

अश्वत्थहुतभुग्वासगोविंदस्यसदाश्रय अशेषंहरमेपापंवृक्षराजनमोस्तुते ११० एवं
पूजाविधिंकृत्वाततः कृत्वाप्रदक्षिणां मौक्तिकैः कांचनैरौप्यैर्हीरकैर्मणिभिस्तथा ११
कांस्यपात्रैस्ताम्रपात्रैर्भक्ष्यपूर्णैः पृथक्पृथक् गृहीत्वाभ्रमणंकार्यंयावत्प्रक्रमणंभवेत्
१२ तावत्प्रदक्षिणंकार्यंयावदष्टोत्तरंशतं समर्पितंचयद्द्रव्यमर्पयेद्गुरवेशुभं १३ सु
वासिनीश्चसंपूज्यसोमासंतुष्टिहेतवे दत्वाचान्नंतुविप्रेभ्योस्वयंभुंजीतवाग्यता १४
एषतेकथितोभूपव्रतराजविधिर्मया द्रौपदींचसुभद्रांचकारयस्वतथोत्तरां १५ उत्त
रागर्भगस्तेनजीवितंलभतेचिरात् युधिष्ठिरउवाच यास्त्वल्पविभवानारीकांचना
द्यैर्विनाकृता १६

व्य चांगलें तें गुरूस समर्पण करावें. १३ नंतर सोमेच्या संतोषा करितां सुवासिनीं
ची पूजा करून, ब्राम्हणांस अन्नदान करून मौनानें आपण भोजन करावें. १४ हे राजन्, मीहा व्रतराज विधि
तुला कथन केला. तर तूं द्रौपदी व सुभद्रा तसीच उत्तरा यांजकडून हा सोमवती व्रताचा विधि करवावा. १५ म्हण १२
जे त्या योगानें उत्तरेच्या पोटांतील गर्भ सुखकर जीवन पावेल. धर्मराज म्हणतात, जी स्त्री सुवर्णादिकानीं विर-

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan ... Joint project ... Mumbai

(14A)

हित व जिचें ऐश्वर्य अल्प आहे. १६ ती या व्रतराजाचें पूर्ण फल कसें पावेल तें सांगा. भीष्मबोलतात, हे पांडवा, वंचना न करितां व वस्त्रादिक अथवा भक्ष्य पदार्थ किंवा फळें, पुष्पें इत्यादिक कोणतेही पदार्थ हातीं घेऊन अश्वत्थास प्रदक्षिणा केल्या असतां त्या स्त्रीला या व्रताचें पूर्ण फळ प्राप्त होतें. १७. हे राजन्, या विष्णूच्या व्रताचें श्रवण केलें असतां ती स्त्री विष्णुपदास जाते व पति, पुत्र, धन प्राप्त होते मग जी या विधीनें व्रत

साकथंलभतेपूर्णंव्रतराजफलंवद भीष्मउवाच फलैःपुष्पैस्तथाभक्ष्यैर्वस्त्रा
द्यैरपिपांडव कुर्यात्प्रदक्षिणांअश्वत्थंसापिपूर्णंलभेत्फलं १७ व्रतमिदमवलंब्यनरेंद्र
विष्णोःश्रुतमनयाहिपराक्रमितमेति पतिसुतधनमित्थंकरोतियालभतेसात्रकिम
त्रचित्रं ११८ इतिश्रीभविष्योत्तरपुराणेसोमवतीअमावास्याव्रतकथासमाप्ता

करते ती या फलातें पावते यांत आश्चर्य काय आहे. ११८ इतिश्री भविष्योत्तर पुराणे सोमवती अमावास्या सार्थ व्रतकथा समाप्ता.

हें पुस्तक पुणें पेठ शनिवार मेहुणपुरा येथें रावजीश्रीधर गोंधळेकर याणीं आपले जगद्धितेच्छु नामक छापखान्यांत छापिलें. तारीख ३ माहे जून. सन् १८७१ इ. सन् १८६५ चा आक्ट २५ प्रमाणें छापणारानें या ग्रंथाचा सर्व प्रकारें हक्क आपणाकडे ठेविला आहे. आवृत्ति १ली.

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(15)

इतिसोमवतीपूजासार्थकथासमाप्ता.

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क


**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**

राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)

**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८

**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com